जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम राबविण्यासाठी निर्माण करण्यात आलेली गटपातळीवरील विस्तार अधिकारी (एग्राविका) या पदांना दिनांक १ ऑक्टोबर,२०१७ पासून दिनांक ३१ डिसेंबर,२०१७ पर्यंत चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः जिग्राप्र-२०१७/प्र.क्र.४१/योजना-५

बांधकाम भवन इमारत, तळमजला,
२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक : २५ ऑक्टोंबर,२०१७.

वाचा :-

१) शासन परिपत्रक क्र.जिग्राप्र-२०१३/४३५/प्र.क्र.१५२/योजना-५,दिनांक ११/११/२०१४.
२) शासन निर्णय क्र. जिग्राप्र-१११६/प्र.क्र.११/योजना-५, दिनांक ०३/०३/२०१६.
३) सदर विभागाचे पत्र क्र.जिग्राप्र-१११६/प्र.क्र.११/यो-५, दिनांक १८/०२/२०१७.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, म.रा.ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे पत्र क्र.एमएसआर एलएम/प्र.क्र.३३२/जा.क्र.४४४/२०१७, दिनांक २८/०२/२०१७
५) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.दि १०/०२/२०१७
६) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आ.पु.क., दि ०३/१०/२०१७.

प्रस्तावना :-

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमधील गटपातळीवरील विस्तार अधिकारी (एग्राविका) -३५१ पदांना संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ५ अन्वये दिनांक १ मार्च,२०१७ पासून दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.६ अन्वये वित्त विभागाच्या धोरणानुसार अस्थायी पदांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ पासून दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुसार सदर पदांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडील गटपातळीवरील विस्तार अधिकारी (एग्राविका) -३५१ पदांना दिनांक १ ऑक्टोबर,२०१७ पासून दिनांक ३१ डिसेंबर,२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर विस्तार अधिकारी (ए.ग्रा.वि.का.) या पदांच्या वेतन व वेतनेतर बाबींवरील खर्च महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (Non-Intensive) संस्था बांधणी/क्षमता बांधणी व प्रशिक्षण या शीर्षाखाली अदा करण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.असंक-१००४/प्र.क्र-१२(भाग-२)/२००४/ वित्तिय सुधारणा-१, दिनांक ४ ऑक्टोबर,२००४ व शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ व दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१७ अन्वये प्रशासकिय विभागाना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन सदर पदांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

विस्तार अधिकारी (ए.ग्रा.वि.का.) ही पदे जिल्हास्तरावरुन पदोन्नती किंवा जाहीरात देऊन भरण्यात येऊ नयेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत-स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201710251730298220 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arunkumar S Pawar

Digitally signed by Arunkumar S Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=657d39eb2b5611f1d936eaf74537e0dd13fd794bed4323fe67b0019d69bec1f0, cn=Arunkumar S Pawar
Date: 2017.10.26 15:37:35 +05'30'

अरुण शं.पवार
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई.
५. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व).
६. उप सचिव (व्यय-१५/अर्थसंकल्प-१७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. उप सचिव (उद्योग) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. जिल्हाधिकारी (सर्व).
९. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व)
१०. अतिरिक्त संचालक, प्रकल्प आखणी व एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
११. उपसचिव / अवर सचिव (सर्व), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई०१-
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व).
१३. संचालक (आस्थापना), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकिय भवन, मुंबई.
१४. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. संचालक, अधिदान व लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६. संचालक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
१७. निवड नस्ती, कार्यासन योजना-५.